# ज्ञानज्योती सावीत्रीबाई फुले
# आधार योजने करीता
# शैक्षणिक निकष

1. सदरचा विदयार्थी 12 वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असावा.
2. व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश मिळालेल्या विदयार्थ्यास सदर योजनेसाठी अर्ज करताना किमान 60% किंवा त्या प्रमाणात ग्रेडेशन/CGPA चे गूण असणे आवश्यक राहील.
3. व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विदयार्थ्यांना गुणवत्तेनुसार त्या संबंधित प्रवर्गातुन प्रवेश देण्यात येतील. यासाठी इयत्ता 12 वी च्या गुणांची टक्केवारी विचारात घेतली जाईल.
4. सदर योजनेतंर्गत एकुण प्रवेश संख्येच्या 70% जागा व्यावसायिक शिक्षण घेणा-या विदयार्थ्यासाठी असतील.
5. निवडलेला विदयार्थी संबंधित अभ्यासक्रमपुर्ण होईपर्यात लाभास पात्र राहील.
6. अखिल भारतील तंत्रशिक्षण परिषद, राज्य शासन किंवा तत्सम संस्था इ. मार्फत महाविदयालयात व मान्यता प्राप्त अभ्यासक्रमासाठी विदयार्थ्यास प्रवेश मिळालेला असावा.
7. एका शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ घेतल्यानंतर पुन्हा इतर शाखेचा पदवी किंवा पदव्यत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यास या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.
8. योजनेंतर्गत लाभ मिळण्याकरिता विदयार्थ्यांची महाविदयालयीन उपस्थिती किमान 75% असावी.
9. निवड करण्यात आलेला विदयार्थी संबंधित अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यंत लाभास पात्र राहील. मात्र विदयार्थ्यास प्रत्येक वर्षी त्या त्या अभ्यासक्रमाच्या परिक्षेस उत्तीण होण अनिवार्य राहील.

# ज्ञानज्योती सावीत्रीबाई फुले आधार योजने करीता

# मुलभुत पात्रता

---

1. विदयार्थी वसतीगृह प्रवेशास पात्र असावा.
2. विदयार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
3. सक्षम प्राधिका-याने दिलेला इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाचा जातीचा दाखला सादर करणे बंधनकारक असेल.
4. अनाथ प्रवर्गामधून अर्ज करणा-या विदयार्थ्यांना महिला व बालकल्याण विभागाकडील सक्षम प्राधिका-याचे अनाथ प्रमाणपत्र अनिवार्य आहे.
5. दिव्यांग प्रवर्गामधुन अर्ज करणा-या विदयार्थ्यांना जिल्हा शल्य चिकित्सक यांचे 40% पेक्षा जास्त दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र अनिवार्य आहे.
6. विदयार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न 2.50 लाखपेक्षा जास्त नसावे. तसेच केंद्र शासनामार्फत ज्या ज्या वेळी मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादेत वाढ होईल, त्यानुसार या योजनेसाठी पालकाची वार्षीक उत्पन्न मर्यादा लागु राहील.
7. विदयार्थ्याने स्वत:चा आधार क्रमांक आपले राष्ट्रीयकृत बँक खात्याशी संलग्न करणे बंधनकारक राहील.
8. विदयार्थ्याने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था ज्या शहराच्या/तालुक्याच्या ठिकाणी आहे. अशा शहरातील सदर विदयार्थी रहिवाशी नसावा.

# ज्ञानज्योती सावीत्रीबाई फुले आधार योजने करीता आवश्यक कागदपत्र

---

1.भाडयाने राहत असल्याबाबत व स्थानिक नसल्याचे प्रतिज्ञापत्र (नोटरी).

2.स्वयंघोषणापत्र (दिलेली माहिती खरी व अचुक असल्याबाबत).

3.कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवेश घेतला नसल्याबाबतचे शपथपत्र.

4.भाडयाने राहत असल्याबाबतचे भाडे चिठठी व भाडे करारपत्र/करारनामा.

5.महाविदयालयात प्रवेश घेतल्याचा पुरावा.

# ज्ञानज्योती सावीत्रीबाई फुले आधार योजने करीता तसेच पंडीत दिनदयाळ योजणेकरीता अर्ज करताना

# अर्जदारानी घ्यावयाची काळजी

---

1. अर्ज विहित नमुन्यात पुर्णपणे भरलेला असावा.
2. महाविदयालयाच्या प्राचार्यांची सही व शिक्का असणे आवश्यक.
3. अर्जासोबत आपण सादर केलेली कागदपत्र बरोबर लागलेली आहे किंवा नाही याची दक्षता घ्यावी.
4. अर्जासोबत सादर केलेले सर्व कागदपत्राच्या छायाप्रती स्वाक्षांकीत करुन सादर कराव्या.
5. अर्ज सादर करतांना अर्जासोबत सादर केलेली कागदपत्र निघणार नाही. स्टॅपल करुन किंवा टॅगमध्ये बरोबर लावलेली असावी. अन्यथा अर्जासोबत लावलेली कागदपत्र निघाल्यास सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.
6. वरीलप्रमाणे सर्व कागदपत्र बरोबर न आढळल्यास अर्ज स्विकारण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब स्वाधार योजना सन 2024-2025 या शैक्षणिक वर्षातील ऑनलाईन अर्ज

**htpps://hmas.mahait.org**

**या पोर्टलवर भरण्यात यावे.**

# भारतरत्न डॉ. बाबसाहेब आंबेडकर स्वाधार योजना

## उदिष्ट

**शासकीय वसतीगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या/शासकीय वसतीगृहात प्रवेश न घेतलेल्या तसेच निवास, भोजन व अन्य सुविधा अभावी पुढील शिक्षण घेवु शकत नसलेल्या अनुसुचित जाती व नवबौध्द विदयार्थ्यांपैकी 12 वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विविध स्तरांवरील महाविदयालय प्रवेश मिळालेल्या विदयार्थ्यांना मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील मुलां-मुलींप्रमाणे भोजन,निवास, शेक्षणिक साहित्य,निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सुविधा स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी रक्कम त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट जमा करण्याचा निर्ण शासनाने घेतलेला आहे.**

# अटी व शर्ती

- विदयार्थी शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असावा.
- विदयार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
- विदयार्थी अनु.जाती व नवबौध्द या प्रवर्गाचा असावा.
- विदयार्थ्याने जात प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.
- या योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज केलेला व प्रवेश न मिळालेल्या अनु.जाती व नवबौध्द विदयार्थ्याचा या योजनेच्या निवडीसाठी प्राधान्याने विचार करण्यात येईल. विदयार्थ्यांने स्वत:चा आधार क्रमांक त्यांने ज्या राष्ट्रीयकृत व शेडयुल्ड बँकेत खाते उघडले आहे. त्या खात्याशी संलग्न करणे बंधनकारक असेल.
- विदयार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न वार्षिक रु.2.50 लाख पेक्षा जास्त नसावे. तसेच केंद्र शासनामार्फत ज्या-ज्या वेळी मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादेत वाढ होईल, त्यानुसार या योजनेसाठी पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा त्या-त्या प्रमाणे लागु राहील.
- विदयार्थी स्थानिक नसावा. (ज्या महाविदयालयात विदयार्थ्याने प्रवेश घेतलेला आहे. तो विदयार्थी ते महाविदयालय ज्या महानगर पालिकेच्या हददीतील आहेत. त्या महानगरपालिकेचा रहिवासी नसावा.)
- महानगरपालिकेच्या हददीपासुन 5 कि.मी परिसरात असलेल्या महाविदयालयात शिक्षण संस्थेत शिक्षण घेत असलेले विदयार्थीसुध्दा या योजनेचा लाभ मिळण्यास पात्र असतील.
- विदयार्थी 12वी नंतरचे उच्च शिक्षण घेणारा असावा.
- 12वी मध्ये विदयार्थ्यांस 50% गुण असल्यावर या योजनेचा पुढे पदवी/पदव्युत्तर शिक्षणाकरीता लाभ घेता येईल.
- पदवी, पदविका, दोन वर्षापेक्षा कमी नसणा-या कोणत्याही मान्यता प्राप्त अभ्यासक्रमात सदर विदयार्थ्यास पुढे लाभ घेण्याकरीता किमान 50% गुण किंवा त्याप्रमाणात ग्रेडेशन/CGPA असणे आवशयक राहील. 12वी नंतर पदविक, पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारा अभ्यासक्रम हा दोन वर्षापेक्षा कमी नसावा. तसेच पदवीनंतर पदव्युत्तर पदवी/ पदविका अभ्यासक्रमाचा कालावधीही दोन वर्षापेक्षा कमी नसावा.(संबंधित अभ्यासक्रम शासकीय वसतीगृहात प्रवेश मिळण्यासाठी अनुज्ञेय असावा.)
- विदयार्थ्यांची निवड गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.
- या योजनेमध्ये दिव्यांग (अनु.जाती व नवबौध्द घटकातील) विदयार्थ्यांसाठी गुणवत्तेची टक्केवारी 40% इतकी राहील व त्यासाठी त्यांची स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.
- या योजनेसाठी खासबाब सवलत लागु राहणार नाही.

# अनुदान वितरण

| अ.क्र. | खर्चाची बाब | मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी, चिंचवड, **नागपूर** या ठिकाणी उच्च् शिक्षण घेणा-या विदयार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | इतर महसुल विभागीय शहरातील व उर्वरीत क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च् शिक्षण घेणा-या विदयार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | इतर जिल्हयाच्या ठिकाणी तसेच महानगरपालिकेच्या हददीपासुन 5 कि.मि. परिसरात असलेली महाविदयालये/शैक्षणिक संस्था या ठिकाणी अनुज्ञेय रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | भोजन भत्ता | 32,000/- | 28,000/- | 25,000/- |
| 2 | निवास भत्ता | 20,000/- | 15,000/- | 12,000/- |
| 3 | निर्वाह भत्ता | 8,000/- | 8,000/- | 6,000/- |
| 4 | प्रति विदयार्थी एकुण संभाव्य देय रक्कम | 60,000/- | 51,000/- | 43,000/- |

# पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम योजना

**धनगर समाज बांधवांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविण्याबाबत विभागाने सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन दिनांक 30 जुलै, 2019 रोजी विदयार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता भोजन, निवास व शैक्षणिक साहित्यासाठी त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरण करण्याबाबत तरतूद केलेली आहे. सदरयोजनेंतर्गत महानगरपालिका, विभागीय शहरे आणि जिल्हास्तरावरील शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश घेतलेल्या धनगर समाजातील विदयार्थ्यांना निवास भत्ता तसेच शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घेण्याकरीता निर्धारीत केलेले अर्थसहाय्यक देण्यात येते. भटक्या जमाती - क प्रवर्गातील धनगर समाजाच्या विदयार्थ्यांना निवासी व शैक्षणिक सुविधांपासून वंचित राहू नये, यासाठी आदिवासी विकास विभागाप्रमाणे धनगर समाजातील विदयार्थ्यांना दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना लागु करण्यात आलेली आहे.**

# शासन निर्णय

- महानगरपालिका, विभागीय शहरे आणि जिल्हास्तरीय शैक्षणिक संस्थामध्ये शिक्षण घेत असलेल्या धनगर समाजाच्या विदयार्थ्यांना सन 2019-20 या शैक्षणिक वर्षापासुन 12वी नंतरच्या मान्यताप्राप्त तंत्र शिक्षण तसेच व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाच्या महाविदयालयामध्ये केंद्रिभूत प्रवेश प्रकियेव्दारे प्रवेश घेतलेल्या परंतु शासकीय वसतीगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या धनगर समाजातील विदयार्थ्यांना " पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयम योजना " या योजनेंतर्गत भोजन, निवास व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घेण्यासाठी विदयार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरण करण्यात या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.
- सदर योजना महानगरपालिका, विभागीय शहरे आणि जिल्हास्तरावरील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या धनगर समाजातील विदयार्थ्यांना मान्यताप्राप्त तंत्रशिक्षण तसेच व्यायसाय शिक्षण अभ्यासक्रमाच्या शासकीय तसेच अनुदानित महाविदयालयांमध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रकियेव्दारे प्रवेश घेऊन शिक्षण घेणा-या धनगर समाजातील विदयार्थ्यांना लागू राहील.
- सदर योजनेंतर्गत शासकीय वसतीगृहामध्ये प्रवेश घेणे किंवा थेट अनुज्ञेय रक्कमेचा लाभ घेणे हे दोन पर्याय विदयार्थ्याकडे उपलब्ध राहणार आहेत.
- खालील प्रकारच्या क्षेत्रनिहाय शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या परंतू शासकीय वसतीगृहात प्रवेशित नसलेल्या धनगर समाजातील विदयार्यिांना 12वी नंतरचे उच्च शिक्षण घेण्याकरिता वार्षिक खर्चासाठी खालीलप्रमाणे निश्चित केल्यानुसार विदयार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरित करण्यात येते.

# अनुदान वितरण

| अ.क्र. | खर्चाची बाब | मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी, चिंचवड, **नागपूर** या ठिकाणी उच्च् शिक्षण घेणा-या विदयार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | इतर महसुल विभागीय शहरातील व उर्वरीत क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च् शिक्षण घेणा-या विदयार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | इतर जिल्हयाच्या ठिकाणी तसेच महानगरपालिकेच्या हददीपासुन 5 कि.मि. परिसरात असलेली महाविदयालये/ शैक्षणिक संस्था या ठिकाणी अनुज्ञेय रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | भोजन भत्ता | 32,000/- | 28,000/- | 25,000/- |
| 2 | निवास भत्ता | 20,000/- | 15,000/- | 12,000/- |
| 3 | निर्वाह भत्ता | 8,000/- | 8,000/- | 6,000/- |
| 4 | प्रति विदयार्थी एकुण संभाव्य देय रक्कम | 60,000/- | 51,000/- | 43,000/- |
| 5 | प्रतिवर्ष महत्तम विदयार्थी संख्या | 7,000/- | 9,000/- | 10,000/- |

# पात्रता

- विदयार्थी धनगर समाजातील असावा. विदयार्थ्याने अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
- विदयार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न वार्षिक रु.2.50 लाख पेक्षा जास्त नसावे. तसेच केंद्र शासनामार्फत ज्या-ज्या वेळी मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादेत वाढ होईल, त्यानुसार या योजनेसाठी पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा त्या-त्या प्रमाणे लागु राहील.
- विदयार्थ्यांने स्वत:चा आधार क्रमांक आपले राष्ट्रीयकृत खात्याशी संलग्न करणे बंधनकारक राहील.
- विदयार्थ्याने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था ज्या शहराच्या ठिकाणी आहे, अशा शहरातील सदर विदयार्थी रहिवासी नसावा.

# शैक्षणिक निकष

- सदरचा विदयार्थी इयत्ता 12वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असावा.
- इयत्ता 12वी मध्ये किमान 60% गुण मिळालेले विदयार्थी या योजनेस पात्र राहतील.
- केंद्र शासनाच्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती करीता निश्चित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांना सदर योजनेंतर्गत लाभ देण्यात येईल. तथापि, दोन वर्षापेक्षा कमी कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ मिळणार नाही.
- एका शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ घेतल्यानंतर पुन्हा इतर शाखेच्या पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यास या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.
- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, राज्य शासन किंवा तत्सम संस्था इत्यादी मार्फत मान्यताप्राप्त महाविदयालयात/संस्थेमध्ये व मान्यता प्राप्त अभ्यासक्रमासाठी विदयार्थ्यास प्रवेश मिळालेला असावा.
- योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी संबंधित विदयार्थ्याने 12वी नंतरच्या मान्यताप्राप्त तंत्र शिक्षण तसेच व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाच्या महाविदयालयामध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश घेतलेला असावा.
- योजनेंतर्गत लाभ मिळण्यासाठी विदयार्थ्याची महाविदयालयीन उपस्थिती 60% असणे बंधनकारक राहील. तथापि, एखादया विदयार्थ्यांच्या उपस्थितीबाबत शंका निर्माण झाल्यास संबंधित महाविदयालयामध्ये विदयार्थ्यांच्या उपस्थितीबाबत शहानिशा करुन विदयार्थ्यास देय असलेली रक्कम अदा करण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात यावा.
- विदयार्थ्याची निवड गुणवत्तेनुसार करण्यात येईल.
- सदर अर्जाला अंतिम मंजुरी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती मार्फत देण्यात येते.

# भारत सरकार शिष्यवृत्ती

## GOI POST MATRIC SCHOLARSHIP

## उदिष्ट

1. मागासवर्गीय विदयार्थ्यांना महाविदयालयीन/ उच्च शिक्षण घेता यावे.
2. विदयार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे.

## अटी व शर्ती

1. विदयार्थी हा अनु.जाती, नवबौध्द, इमाव, विजाभज व विमाप्र प्रवर्गातील असावा.
2. अनु. जाती व नवबौध्द विदयार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.2.50 लाख व विजाभज, विमाप्र, इमाव या विदयार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.1.50 किंवा त्यापेक्षा कमी असावे.
3. विदयार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

## लाभाचे स्वरुप

1. विदयार्थ्यास निर्वाहभत्ता व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर मान्य बाबीवरील शुल्क प्रदान.
2. अनु. जाती व नवबौध्द विदयार्थ्यांना दरमहा रु.230 ते रु.550 व विजाभज, विमाप्र, इमाव या विदयार्थ्यांना दरमहा रु.90 ते रु.190 दराने निर्वाहभत्ता.
3. वसतीगृहात राहून शिक्षण घेणा-या अनु. जाती व नवबौध्द विदयार्थ्यांसाठी दरमहा रु.380 ते रु.1200 व विजाभज, विमाप्र, इमाव या विदयार्थ्यांना दरमहा रु.150 ते रु.425 निर्वाहभत्ता.

## या योजनेसाठी

# htpp://mahadbt.maharashtra.gov.in

या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

## संपर्क

**संबंधित महाविदयालयाचे शिष्यवृत्ती विभाग**

**व**

**संबंधित जिल्हयांचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण**